बिना सहकार नही उध्दार !

# अर्चनानगर सहकारी गृहरचना संस्था मर्यादित

३९/२/२, एरंडवणा, पुणे-४११०३८.

नोंदणी क्र.: पी.एन.ए./एच.एस.जी./(टी.सी.)/१७०७/१९८९-९० दि. २७/१०/१९८९

Email : archananagar.chs @gmail.com

जा. क्र. 2024-25/19 दि. 19.8.2024.

## वार्षिक सर्वसाधारण सभा वृतांत

अर्चनानगर सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पुणे ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ११/०८/२०२४ रोजी दुपारी २ वाजता स्व मुकुंदराव पणशीकर कार्यकर्ता प्रशिक्षण केंद्र ,सेवा भवन , तळ मजला, सर्वे नंबर १३६,प्लॉट नंबर ३४, एरंडवणे पुणे ४११००४ येथे घेण्यात आली. सदर सभेस ६५ सन्माननीय सभासद उपस्थित होते. सभेच्या सुरवातीला संस्थेचे अहवाल कालावधी मध्ये दिवंगत झालेले सभासद ,हितचिंतक यांना श्रद्धांजली वाहण्यात आली व सभेच्या कामकाजास सुरवात झाली .

**विषय क्रमांक १** :- दिनांक ०३/०९/२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृतांत वाचून कायम करणे.

**ठराव क्रमांक १** :- दिनांक ०३/०९/२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृतांत संस्थेचे लेखनिक श्री दत्तात्रय दहीभाते यांनी वाचून दाखवला . संस्थेच्या सभासद डॉ देवयानी पंडित यांनी मी उपस्थित केलेल्या मुद्द्याचा तपशील सभेच्या वृतांत मध्ये आला पाहिजे अशी सूचना केली. व वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृतांत वर सविस्तर चर्चा करून तो एकमताने कायम करण्यात आला .

**सूचक श्रीमती रजनी भट**

**अनुमोदक मोहनराव देशमुख**

**"ठराव सर्वानुमते मंजूर"**

**विषय क्रमांक २** :- संस्थेच्या २०२३-२०२४ ( १ एप्रिल २०२३ ते ३१मार्च २०२४ ) च्या वार्षिक हिशोब पत्रकास मान्यता देणे.

**ठराव क्रमांक २** :- संस्थेची २०२३-२०२४ ( १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ ) या कालावधीची हिशोब पत्रके संस्थेचे लेखापरीक्षक श्री बी .एम .पेन्सलवार , सदनी लेखापाल यांनी केली असून संस्थेचे लेखनिक दत्तात्रय दहिभाते यांनी वाचून दाखवली. डॉ देवयानी पंडित यांनी खर्च उत्तपन्न खात्यामध्ये फिजीबीलिटी रिपोर्ट वर्गणी जमा रुपये २,८७,४००.००/- व जमा नावे पत्रकात हि वर्गणी रु २,७२,४००/- आहे असे प्रश्न विचारले . या वर योग्य तो खुलासा करून वार्षिक हिशोब पत्रके ती सर्वानुमते मान्य करण्यात आली.

**सुचक श्री प्रसाद वैद्य**

अर्चनानगर सह. गृहरचना संस्था मर्यादित रजि. नं. पीएनए/एचएसजी/टी सी/१७०७ १९८९-९० पुणे-४११०३८

**अनुमोदक श्री माधव कुलकर्णी**

**"ठराव सर्वानुमते मंजूर"**

**विषय क्रमांक ३** :- संस्थेच्या २०२३-२०२४ च्या अहवालास मान्यता देणे .

**ठराव क्रमांक ३** :- संस्थेचा सन २०२३-२०२४ चा अहवाल संस्थेचे अध्यक्ष श्री प्रशांत भोसले यांनी वाचून दाखवला या विषयावर सविस्तर चर्चा होऊन अहवालास मान्यता देण्यात आली.

**सूचक श्री जयंत ढापरे**

**अनुमोदक श्री गोविंद कदम**

**"ठराव सर्वानुमते मंजूर"**

**विषय क्रमांक ४** :- २०२४-२०२५ सालासाठी वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करणे .

**ठराव क्रमांक ४** :- या विषयावर सविस्तर चर्चा होऊन सन २०२४-२०२५ या कालावधीसाठी बी . एम . पेन्सलवार, सनदी लेखापाल यांची वैधानिक लेखापरीक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे व त्यांच्या नेमणुकीचे पत्र त्यांना दयावे असा निर्णय घेण्यात आला.

**सूचक श्री धनंजय रानडे**

**अनुमोदक श्री किशोर बोधनी**

**"ठराव सर्वानुमते मंजूर"**

**विषय क्रमांक ५** :- २०२४-२०२५ च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे

**ठराव क्रमांक ५** :- संस्थेचे सन २०२४-२०२५ या कालावधीचे अंदाजपत्रक संस्थेचे खजिनदार श्री मनोज कचरे यांनी वाचून दाखवून ते कायम करण्यात आले . या मध्ये प्रामुख्याने संस्थेच्या पुनर्विकास संदर्भात होणाऱ्या विशेष सर्वसाधारण सभा, सरकारी मोजणी खर्च, विशेष सर्वसाधारण सभा, प्रकल्प व्यवस्थापन सल्ला फी या खर्चाचा समावेश आहे .

**सूचक श्री आशिष कुलकर्णी**

**अनुमोदक श्री विद्याधर ठोसर**

**"ठराव सर्वानुमते मंजूर"**

...नगर सह. गृहरचना संस्था मर्यादित
रजि. नं. पीएनए/एचएसजी/टी सी/१७०७ १९८९-९०
पुणे-४११०३८

**विषय क्रमांक ६ :-** मागील अंदाज पत्रकापेक्षा जास्त खर्च झाला असेल तर त्यास मान्यता देणे

**ठराव क्रमांक ६** :- मागील अंदाजपत्रकापेक्षा, विशेष सर्वसाधारण सभा व वास्तुविशारद सल्लागार नेमणूक, यावर जास्त खर्च झालेला आहे . त्यास वार्षिक सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात आली.

**सूचक श्री ए डी रावराणे**

**अनुमोदक श्री प्रभाकर माडीवाले**

**"ठराव सर्वानुमते मंजूर"**

**विषय क्रमांक ७** :- संस्थेच्या पुनर्विकास प्रकरणी निविदा सादर करणे , सविस्तर चर्चा करून निणर्य घेणे

**ठराव क्रमांक ७** :- संस्थेच्या पुनर्विकास प्रकरणी वास्तुविशारद सल्लागार (DD Architect) यांनी निविदा मसुदा (Tender document ) सादर केला. तो मसुदा सविस्तर पणे पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयामध्ये पुढील ८ दिवस उपलब्ध होईल. ज्या सभासंदना या मध्ये काही सूचना /बदल सुचवायचे आहेत त्यानी लेखी कळवावे. त्या नंतरच निविदा (Tender document) अंतिम करण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला .

**सूचक श्री प्रसाद वैद्य**

**अनुमोदक सौ मेघना रानडे**

**"ठराव सर्वानुमते मंजूर"**

**विषय क्रमांक ८ :-** मा अध्यक्ष यांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयावर चर्चा करणे व निर्णय घेणे

**विषय क्रमांक ८** :- अ संस्थेच्या पुनरविकास संदर्भात बँक खाते उघडणे बाबत उधडणे बाबत

**ठराव क्रमांक ८ अ** :- संस्थेच्या पुनरविकास संदर्भात राष्टीयकृत बँकेत तीन बँक खाती असणे आवश्यक आहे संस्थेकडे त्यापैकी एक खाते स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये आहे उर्वरीत दोन नवीन बँक खाती राष्टीयकृत बँके मध्ये उघडण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला. त्यापैकी एक बँक खाते त्वरित उघडण्यात यावे व दुसरे बँक खाते आवश्यकतेनुसार उघडण्यात यावे असा निणर्य घेण्यात आला.

**सूचक श्री सुनील उप्पाध्ये**

**अनुमोदक श्री किशोर सावजी**

**"ठराव सर्वानुमते मंजूर"**

अर्जुननगर सह. गृहरचना संस्था मर्यादित
रजि. नं.
पीएनए/एचएसजी/
टी सी/१७०७
१९८९-९०
पुणे-४११०३८

**विषय क्रमांक ८ ब** :- इदिराबाई कुलकर्णी , इमारत क्रमांक D, दुकान क्रमांक ६ यांच्या वतीने सुनील कुलकर्णी यांनी दिलेल्या पत्राबाबत

**ठराव क्रमांक ८ ब** :- इदिराबाई कुलकर्णी , इमारत क्रमांक D, दुकान क्रमांक ६ यांच्याकडून संस्था देखभाल वर्गणी पोटी रु ९३,२३०/- ३१ मार्च २०२४ अखेर थकबाकी आहे. त्या वसुली बाबत त्यांना कायदेशीर नोटीस पाठवली आहे . त्यांनी वर्गणी बाबत सूट मिळावी असा अर्ज केला होता या अर्जावर सविस्तर चर्चा होऊन त्यांना सूट देऊ नये व व त्यांचाकडून सर्व संस्था देखभाल वर्गणी वसूल करण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला.

**सूचक श्री जयंत ढापरे**

**अनुमोदक श्री माधव कुलकर्णी**

**"ठराव सर्वानुमते मंजूर"**

**विषय क्रमांक ८ क** :- थकबाकी साठी दंड व्याज घेणे बाबत

**ठराव क्रमांक ८ क** :- ३१ मार्च २०२५ नंतर ज्या सभासदांकडे थकबाकी राहील त्यावर द.सा.द.शे १८% व्याज, (प्रति महिना १.५०%) आकारण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला.

**सूचक श्री प्रसाद वैद्य**

**अनुमोदक श्री किशोर सावजी**

**"ठराव सर्वानुमते मंजूर"**

**विषय क्रमांक ८ ड** :- संस्थेच्या पुनर्विकास संदर्भात टेंडर ची वर्तमान पत्रात जाहिरात देण्यासाठी लागणाऱ्या खर्चास मान्यता देणे घेणे बाबत

**ठराव क्रमांक ८ ड** :- संस्थेच्या पुनर्विकास संदर्भात टेंडर ची पुणे , मुंबई मधील वर्तमान पत्रात जाहिरात दयावी लागणार आहे त्या साठी रु, ३,००,००० /- खर्च येणार आहे त्या खर्चास सर्वसाधारण सभेने मान्यता दिली.

**सूचक श्री जयंत ढापरे**

**अनुमोदक श्री माधव कुलकर्णी**

**"ठराव सर्वानुमते मंजूर"**

**विषय क्रमांक ८ इ** :- दुय्यम भागप्रमाण पत्र (नक्कल प्रत) देण्यासाठी फीस आकारणे बाबत

ऊर्जानगर सह. गृहरचना संस्था मर्यादित
रजि. नं. पीएनए/एचएसजी/टी सी/१७०७ १९८९-९०
पुणे-४११०३८

**ठराव क्रमांक ८ इ** :- ज्या सभासदांना दुय्यम भाग प्रमाण पत्र (नक्कल प्रत) पाहिजे आहे त्यांनी संस्थेकडे रीतसर अर्ज करावा व त्या सोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडावीत व रु ५००/- फीस दयावी असा निणर्य घेण्यात आला.

**सूचक श्री धनंजय रानडे**

**अनुमोदक श्री किशोर सावजी**

**"ठराव सर्वानुमते मंजूर"**

**विषय क्रमांक ८ ई** :- ज्या इमारतींनी संस्थचे PAN CARD वापरून देखभाली साठी बँक खाती उघडली आहेत ते बंद करणे बाबत

**ठराव क्रमांक ८ ई** :- ज्या इमारतींनी संस्थचे PAN CARD वापरून देखभाली साठी बँक खाती उघडली आहेत त्या खात्यावर मिळणारे व्याज व त्यांनी ठेवीवर ठेवलेले व्याज संस्थेचे उत्पन्न म्हणून दिसत आहे त्यामुळे हि सर्व खाती बंद करावी असा निर्णय घेण्यात आला.

**सूचक श्री आशिष कुलकर्णी**

**अनुमोदक श्री प्रभाकर माडीवाले**

**"ठराव सर्वानुमते मंजूर"**

सभेपुढील विषय संपल्यामुळे संस्थेचे अध्यक्ष यांनी उपस्थित कार्यकारणी सदस्यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

अर्चनानगर सह. गृहरचना संस्था मर्यादित
अध्यक्ष

अर्चनानगर सह. गृहरचना संस्था मर्यादित

अर्चनानगर सह. गृहरचना संस्था
रजि. नं. पीएनए/एचएसजी/टी सी/१७०७ १९८९-९०
पुणे-४११०३८